**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १२/२०१६-१७/ १०४ दिनांकः १०-०८-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. १२/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| श्री रामचंद्र बाबूराव लोले,<br>मु.पो. पेठ वडगांव ता. हातकणंगले<br>जिल्हा कोल्हापूर. | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पेठ वडगांव | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-**
१. श्री वि. श. गुळवणी, अध्यक्ष
२. श्री. प्र. वि.खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी, अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री रामचंद्र बाबूराव लोले रा. पेठ वडगांव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर हे यंत्रमाग वीज कनेक्शनचे धारक होते व त्यांचा ग्राहक क्र. २५०२५०२११७७ असा होता. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या विद्युत बिलामध्ये नमूद केलेली थकबाकीच्या व्याजाची रक्कम रु. २७,७३९/- आणि त्यावरील विलंब आकाराची रक्कम रु. ११२/- अशी एकूण रक्कम रु. २७,८५१/- माफ करुन कमी करुन मिळावी.

त्यांची अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचेकडे केलेली तक्रार अमान्य करणेत आली असून सदर तक्रारदार यांना यंत्रमाग संजीवनी योजनेपेक्षा समायोजित (वजावाट) केलेली रक्कम व्याज व विलंब आकारापेक्षा जास्त असल्याने आणि त्यांना सदर योजनेतील मंजूरीपेक्षा जादा लाभ मिळलेला असल्याने त्यांनी ऊर्वरीत थकबाकी भरावी असाही आदेश सदर कक्षाने पारित केला आहे.

२) वितरण कंपनीतर्फे सविस्तर लेखी निवेदन देण्यात आले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, सन २००४ मध्ये तक्रारदार यांना एप्रिल आणि जुलै-२००४ मध्ये चुकीची वजावाट देण्यात आली होती. तक्रारदार यांचेकडे मार्च-२००४ मध्ये थकबाकी व्याज व दंडासह रु. १,३१,३०४.१४ इतकी होती. त्यांना यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे मिळणा-या माफीची रक्कम रु. ७९,५७८.२० इतकी होत होती. तथापि एप्रिल व जुलै २००४ मध्ये त्यांच्या विज बिलातून रु. १,६८,७३७.१० म्हणजे रक्कमेपेक्षा रु. ८९,१५८.९० पैसे इतक्या रक्कमेची वजावाट देण्यात आली होती. सदरच्या चुकीच्या वजावाटीमुळे तक्रारदार यांचेकडून रु. ८९,१५८.९० पैसे इतकी रक्कम वि.पं. यांना येणे आहे. तक्रारदार यांनी वेळोवेळी वीज बिले पूर्णपणे भरली नसल्याने दंड व व्याजाची रक्कम वाढलेली आहे. शेवटी वि.पं. तर्फे तक्रारदार यांची विनंती/तक्रार फेटाळणेत यावी अशी मागणी केली आहे.

३) दिनांक ०९-०८-२०१६ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदार अगर त्यांच्यातर्फे कोणीही प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प. तर्फे श्री रणजीत पाटील उपकार्यकारी अभियंता, पेठवडगांव व श्री महेश साळोखे उपव्यवस्थापक(विवले) , जयसिंगपूर हजर होते. त्यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. तक्रारदार आजारी असल्याची त्यांना माहिती मिळाल्याचे श्री रणजीत पाटील यांनी सांगितले.

४) या मंचातर्फे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांची व्याज व विलंब आकाराची एकूण रक्कम रु. २७,८५१/- कमी करुन मिळणेबद्दलची मागणी योग्य व स्विकारार्ह आहे का?

उत्तरः- नाही.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- खालील प्रमाणे.

## <u>कारणमिमांसा</u>

५) तक्रारदार हे यंत्रमाग वीज कनेक्शन धारक होते याबद्दल वाद नाही. सन-२००४ मध्ये यंत्रमाग संजीवनी योजनेनुसार यंत्रमाग धारकांना त्यांच्या वीज बिलांमध्ये शासनाकडून काही प्रमाणात सवलत देणेत आली होती. वितरण कंपनीतर्फे असे निवेदन देणेत आले आहे की, तक्रारदार यांना रु. ८९,१५९/- रुपयांचा

अतिरिक्त फायदा चूकीने देणेत आला होता. तक्रारदाराच्या CPL मध्ये व्याज रु. २७,७३९/- आणि विलंब आकार /दंड रु ११२/- यांची वजावाट दिली असल्याचे दिसून येते.

६) तक्रारदार यांनी त्यांच्या वीज बिलातून एकूण रु. २७,८५१/- एवढी रक्कम कमी/माफ करुन मिळणेस या प्रकरणात विनंती केली आहे. त्याबाबत त्यांनी कोणतेही वीजबिल/नोटीस वगैरे कोणताही कागद हजर केलेला नाही. वि.पं. तर्फे असे तोंडी कथन केले आहे की, सप्टेंबर २००९ मध्येच तक्रारदारांचे वीज कनेक्शन कायम स्वरुपी तोडणेत आले होते. म्हणजे तक्रारदार हे सप्टेंबर २००९ पासून उपरोक्त यंत्रमाग कनेक्शनचे वीज ग्राहक नाहीत. त्यांना वि.प. तर्फे कोणतीही नोटीस अगर व्याज मागणी केलेली स्पष्ट होत नाही. प्रस्तुत तक्रार दोन वर्षाच्या मुदतीत दाखल केलेली नाही.यामुळे सदर तक्रार ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम कलम ६.६ प्रमाणे रद्द होणे पात्र आहे.

७) तक्रारदारांचा तक्रार अर्ज अत्यंत मोघम आहे. त्यावरुन फारसा बोध होत नाही. त्यांनी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेले नाहीत त्यामुळे प्रस्तुत गा-हाणे नामंजूर करणे भाग आहे. तक्रारदार यांना यंत्रमाग संजीवनी योजनेमध्ये नियमापेक्षा अतिरिक्त लाभ मिळाला आहे असे वि.प. तर्फे निवेदन आहे. त्याबाबत वितरण कंपनी कायद्यानुसार अनुज्ञेय असल्यास योग्य ती कारवाई अलाहिदा करु शकतात.

वरील सर्व कारणांस्तव सदर मंच खालील प्रमाणे अंतिम आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. ग्राहक तक्रारदार श्री रामचंद्र बाबूराव लोले रा. पेठवडगांव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांचा तक्रार नामंजूर करणेत येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| (वि. श. गुळवणी)<br>अध्यक्ष | (पी.व्ही. खपली)<br>सदस्य सचिव | (श्री पी. एस. बुरांडे)<br>ग्राहक सदस्य |